divyamarathi.com

दयानंदला यूजीसीचे दीड कोटीचे अनुदान

सोलापूर दयानंदमहाविद्यालयास यूजीसीकडून कॉलेज ऑफ पोटेंशिअल फॉर एक्सलन्सचे दुसऱ्यांदा मानांकन मिळाले. या महाविद्यालयास अकराव्या वित्त आयोगाच्या कालावधीत एक कोटीचे अनुदान प्राप्त झाले होते. आता दुसऱ्यांना दीड कोटीचे अनुदान यूजीसीकडून प्राप्त झाले. या अनुदानातून विविध शैक्षणिक सुधारणा करण्यात येतात. मागील अनुदानातून प्रयोगशाळा सुसज्जीकरण, ग्रंथालय, कार्यालय, संशोधन, शैक्षणिक साहित्य, उपकरणे यासाठी निधी उपयुक्त ठरला. आता प्रयोगशाळा, भाषा प्रयोगशाळा, शास्त्रीय उपकरणे, ग्रंथालय आधुनिकीकरण यासाठी निधी उपयुक्त ठरणार आहे. यूजीसीच्या सीपीईअंतर्गत दुसऱ्यांदा अनुदान मिळणारे दयानंद हे एकमेव महाविद्यालय आहे.